# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**विविध विषयातील सहायक प्राध्यापक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, (महाविद्यालयीन शाखा) गट-अ. (अपंग भरती) उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

**धारिका क्रमांक : १५(२)(१८)/१६५७/अपंग/सात**

**आयोगामार्फत विविध विषयातील सहायक प्राध्यापक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, (महाविद्यालयीन शाखा) गट-अ. (अपंग भरती) उच्च व तंत्रशिक्षण विभाग** पदावरील सरळसेवा भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- १६**

**अपंग भरती : अपंगांसाठी राखीव १६ पदे विज्ञापीत करण्यात येत आहेत. विषय निहाय दर्शवीण्यात आलेल्या अपंग प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अन्य पात्र प्रवर्गातील अपंग उमेदवारांचा किंवा अन्य विषयांसाठी अर्ज केलेल्या पात्र अपंग उमेदवारांचा विचार शासनाच्या क्र. अपंग २०११/(२७२/११) मशि-१ दिनांक १६ नोव्हेंबर, २०१३ रोजीच्या पत्रानूसार आयोगामार्फत करण्यात येईल.**

| जाहिरात क्रमांक | विषय | एकूण पदसंख्या | आरक्षित अपंग प्रवर्ग | अपंगाचा पात्र प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १४/२०१५ | इंग्रजी | १ | ब | अ,ब,क |
| १५/२०१५ | उर्दु | १ | अ | अ,क |
| १६/२०१५ | भौतिकशास्त्र | १ | ब | ब,क |
| १७/२०१५ | वनस्पतीशास्त्र | १ | ब | ब,क |
| १८/२०१५ | जीवशास्त्र | १ | क | ब,क |
| १९/२०१५ | रसायनशास्त्र | २ | ब व क (प्रत्येकी एक पद ) | ब,क |
| २०/२०१५ | मराठी | १ | अ | अ,ब,क |
| २१/२०१५ | संस्कृत | १ | अ | अ,ब,क |
| २२/२०१५ | मानसशास्त्र | १ | क | ब,क |
| २३/२०१५ | प्राणीशास्त्र | १ | ब | ब,क |
| २४/२०१५ | इतिहास | १ | क | ब,क |
| २५/२०१५ | गृहशास्त्र | १ | क | अ,क |
| २६/२०१५ | तत्वज्ञान | १ | अ | अ,क |
| २७/२०१५ | कायदा | १ | अ | अ,क |
| २८/२०१५ | न्यायविज्ञानशास्त्र | १ | क | ब,क |
| २९/२०१५ | समाजशास्त्र | -- | -- | अ,ब,क |
| ३०/२०१५ | व्यापारी कायदा | -- | -- | अ,क |
| ३१/२०१५ | लोकप्रशासन | -- | -- | अ,क |
| ३२/२०१५ | गणित | -- | -- | अ,क |
| ३३/२०१५ | पर्शियन | -- | -- | अ,क |
| ३४/२०१५ | मार्केटिंग | -- | -- | अ,क |
| ३५/२०१५ | अरेबिक | -- | -- | अ,क |
| ३६/२०१५ | फायनान्स | -- | -- | अ,क |
| ३७/२०१५ | ऑपरेशन | -- | -- | क |
| ३८/२०१५ | हयुमेन रिसोर्स | -- | -- | क |
| ३९/२०१५ | अर्थशास्त्र | -- | -- | अ,ब,क |
| ४०/२०१५ | जैविकतंत्रज्ञान | -- | -- | ब,क |
| ४१/२०१५ | भूगर्भशास्त्र | -- | -- | ब,क |
| ४२/२०१५ | सुक्ष्मजिवशास्त्र | -- | -- | ब,क |
| ४३/२०१५ | राज्यशास्त्र | -- | -- | अ,क |
| ४४/२०१५ | भूगोल | -- | -- | ब,क |
| ४५/२०१५ | सांख्यिकीशास्त्र | -- | -- | क |
| ४६/२०१५ | इलेक्ट्रॉनिक्स | -- | -- | क |
| ४७/२०१५ | जिवरसायनशास्त्र | -- | -- | क |
| ४८/२०१५ | संगणकशास्त्र | -- | -- | ब,क |
| ४९/२०१५ | भारतीय प्राचिन इतिहास | -- | -- | अ,क |

(१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक अपंग/२०११/(२२/११)/मशि-१, दिनांक- १२ सप्टेंबर,२०१२ नुसार खालील अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत:-

**(अ)** अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (Blindness or Low Vision) **(ब)** श्रवणशक्तीतील दोष (Hearing impairment) **(क)** चलनवलन विषयक विकलांगता व मेंदूचा अर्धांग वायू (Locomotor disability or Cerebral Palsy).

**३. वेतनश्रेणी-** रु १५,६०० - ३९,१०० + ग्रेड पे रु. ६,०००/- , **एकूण वित्तलब्धी अंदाजित रु. ४०,०००/-.**

**४. पात्रता :-**

**४.१** भारतीय नागरिक.

**४.२ वय:- (१) दिनांक १ ऑगस्ट, २०१५** रोजी **४५वर्षापेक्षा जास्त नसावे**.

**४.३ शैक्षणिक अर्हता :-**

**(a)** Good academic record with at least 55% marks (or an equivalent grade in a point scale wherever grading system is followed) at the Master's Degree level in a relevant subject from an Indian University, or an equivalent degree from an accredited foreign university.

**(b)** Besides fulfilling the above qualifications, the candidate must have cleared the National Eligibility Test (NET) conducted by the UGC, CSIR or similar test accredited by the UGC like SLET/SET.

**(c)** Notwithstanding anything contained in (a) & (b) above candidates, who are, or have been awarded a Ph.D. Degree in accordance with the University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of Ph.D. Degree) Regulations 2009, shall be exempted from the requirement of the minimum eligibility condition of NET/ SLET/SET.

**(d)** NET SLET/SET shall also not be required for such Masters Programmes in disciplines for which NET SLET/SET is not conducted.

४.४ A relaxation of 5% may be provided, from 55% to 50% of the marks to the Ph.D. degree holders, who have obtained their Master's degree prior to 19th September, 1991.

४.५ A relaxation of 5% may be provided at the graduate and master's level for the SC/ST/Differently-abled (Physically and visually differently-abled) categories for the purpose of eligibility and for assessing good academic record during direct recruitment to teaching positions. Rounding off of marks to make it to 55% or 50% as the case may be through grace mark procedure etc., by Universities is not permissible for claiming relaxation.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे किंवा अन्य योग्य निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७.कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८.शुल्क : १) अमागास - रु.५१५/- २) मागासवर्गीय - रु.३१५/-**

**९. अर्ज करण्याची पद्धत :-**

**९.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ **पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज** mahampsc.mahaonline.gov.in **या वेबसाईटद्वारे दिनांक १६ एप्रिल, २०१५ ते दिनांक ६ मे, २०१५ या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.**

**९.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**९.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**९.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड. (४) क्रेडिट कार्ड. (५) संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

**९.६** mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायंतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

**९.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर 'Unpaid' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) " Pay Now " या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४)उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५)नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६)उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७)ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१०.**चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.**परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.उमेदवारांने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्यावेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१३. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ६ मे, २०१५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१४.चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ७ मे, २०१५ पर्यंत बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण : मुंबई** **सु. सं. केसरकर**

**दिनांक : १६ एप्रिल, २०१५** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**